# संदर्भ ग्रंथसूची

# संदर्भ ग्रंथसूची

## आधारग्रंथ


१. कोळगावकर उत्तम - 'तळपाणी', मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्रथमावृत्ती २०००

२. ठोकळ ग. ल. (संपा.) - 'मीठभाकर', श्री लेखन वाचन भांडार पुणे, तिसरी आवृत्ती, १९५२

३. भालेराव इंद्रजित - 'पीकपाणी', बी. रघुनाथ प्रकाशन, परभणी, प्रथमावृत्ती, १९९२

४. महानोर ना. धों. - 'रानातल्या कविता', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६७

५. महानोर ना. धों. - 'वही', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७१

६. महानोर ना. धों. - 'पावसाळी कविता', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८२

७. महानोर ना. धों. - 'अजिंठा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८४

८. महानोर ना. धों. - 'प्रार्थना दयाघना', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७०

९. महानोर ना. धों. - 'गाथा शिवरायाची', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९१

१०. महानोर ना. धों. - 'जगाला प्रेम अर्पावे', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९०

११. महानोर ना. धों. - 'गंगा वाहू दे निर्मळ', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००७

## संदर्भ ग्रंथसूची


१. कुलकर्णी अंजली - 'ग्रामीण कविता : वास्तव आणि परिवर्तनाच्या दिशा', 'विचारधारा', दिवाळी अंक, २००२

२. कुलकर्णी गो. म. - 'मराठी ग्रामीण साहित्य : परिषद आणि प्रवाह', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९९

३. कुलकर्णी मधु - 'ललित साहित्यातील आकृतीबंधांची जडणघडण', शुभदा सारस्वत पब्लिकेशन, पुणे, १९८७

४. कोत्तापल्ले नागनाथ - 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९८५

५. गायकवाड हेमलता - 'गगनाला पंख नवे', फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००१

६. जाधव रा. ग. - 'साठोत्तरी मराठी कविता व कवी', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९०

७. जाधव वामन - 'ग्रामीण साहित्य आणि शेतकरी जीवन', प्रा.वामन जाधव, शिक्षक हौसिंग सोसायटी, इसबावी, पंढरपूर, प्रथमावृत्ती २००७

८. ठकार निशिकांत - 'मराठी कविता : स्वरूप आणि विवेचन', स्वाध्याय महाविद्यालय, पुणे, १९७७

९. ठाकूर रवींद्र - 'प्रवाह आणि प्रतिक्रिया', (१९७५ नंतरची मराठी कविता), स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९९

१०. डहाके वसंत आबाजी - 'कवितेविषयी', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, १९९९

११. नलगे चंद्रकुमार - 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास', सुरेश एजन्सीज, पुणे, प्रथमावृत्ती १९९६

१२. नलगे चंद्रकुमार - 'ग्रामीण साहित्य : अपेक्षा आणि उपेक्षा', अधिका प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९५

१३. पाटणकर वसंत - 'कविता : संकल्पना निर्मिती आणि समीक्षा', मुंबई विद्यापीठ व अनुभव प्रकाशन, मुंबई १९९५

१३. पाटणकर रा. भा. - 'सौंदर्यमीमांसा' इथेटिक्स सोसायटी, मौज प्रकाशन, मुंबई १९७४

१४. परांजपे प्रभाकर - 'कविता दशकाची', दिनकर गांगल, ग्रंथाली चिटणीस, मुंबई प्रथमावृत्ती १९८०

१५. पाटील म. सु. - 'कवितेचा रूपशोध', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, १९९९

१६. पाटील शिवाजी - 'कविता : भाषा व परिसर', रजत प्रकाशन, औरंगाबाद, २००८

१७. मुलाटे वासुदेव - 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि दिशा', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९४

१८. मुलाटे वासुदेव - 'नवे साहित्य : नवे आकलन', मराठवाडा पब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९६


----x----

# परिशिष्ट

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# परिशिष्ट

## ना. धो. महानोरांच्या काही दीर्घ कविता

गिधाडासारखं विमान संथ
उतरलं जमिनीवर
आणि साहेबाचं पाहणी पथक
शंभर गाड्यांनी सामोरं आलं
रयतेचा राजा
राजरस्त्यावर
अपार कडेकोट बंदोबस्तात
चिटपाखरांशिवायचे सगळेच रस्ते
सगळेच राजरस्ते माणसांशिवायचे
ओसाड भयभीत स्मशानासारखे

प्रचंड किंकाळ्या
ओक्साबोक्सी
रडण्याचा आवाज बंदिस्त घरातून
कडेकोट बंद दरवाजातून
चुकार एखादा रक्तबंबाळ माणूस
हलका गलका
गुडीगुप्प होणारा
कुठल्यातरी प्रार्थनामंदिरात जमाव
संभावित माणसं धर्माच्या पडद्याआड
- शहर उजाड.
संबंध शहराचे रस्ते नुस्ते
मरणग्रस्त ग्रासलेले
पाशवी मनाच्या आंधळ्या डोळ्यांचे
पुरातन बेदरकार झेंड्याझेंड्याचे
सगळं माणूसपण बासनात बांधून
खिकाळत बसलेले राक्षसी हत्यारांत
वेढलेले रस्ते ... नुस्ते नुसते ...
रस्ते ग्रासलेले

प्रचंड खाकीच्या माणसांनी
(बनावट खादीच्या माणसांनी)
भयभीत एकेकटे ठप्प झालेले
शहरभर दूरवर तुटक्या घरांचे
जळालेले खंडहर रस्त्या रस्त्यांवर
सामान्य माणसांचे
ठिबकत गेलेले रक्तबंबाळ थारोळे
शहर भुताटकी अफवांच्या वाऱ्यावर

हजार पोलिसांनी वेढलले साहेब
सुभेदारी बंगल्यात
सुरक्षित आरक्षित
बसलेले एकटे
चिटपाखरूही नसलेल्या
माणसांच्या चर्चेत
कागदांच्या
प्रचंड ढिगाऱ्यात साहेब
साहेब भयव्याकुळ
घामेजून थकून हकबून गेलेले
मृत्यू मृत्यू मृत्यू आणि मृत्यू ...
प्रचंड शस्त्रांचे आकडे निनावी
माणसं माणसांना
पारखी होऊन माणूसपण विसरून
पशूपक्ष्यांपेक्षाही अडाणी निर्विकार
पसायदान विसरून
विसरून कबीर आणखी कुराण इत्यादी
खुर्च्यांच्या राजवर्खी स्वार्थानं पेटलेली
आंधळी माणसं गजर करताहेत
खुर्च्यांच्या खोट्या अहंकारात गढलेली

थोराड माणसं गजर करताहेत.
चिंध्याची रंगीत टोपी जोडून
त्याला राजमुकुट म्हणताहेत.
सगळा आकांत
अविश्रांत माणसं पागल झालेली
गल्लीबोळातून
गरिबाला जगणं कठीण झालेलं
गल्लीबोळातून
माणस कापताहेत सरळसोट संबंध
कुठेच कुणाला धरबंध नाही
गल्लीबोळातून
मृत्यूचे आकडे
झाकलेले उघडे
खोटेनाटेही
कित्येक निरपराध
नावांशिवायच्या
बेनाम घरांत
आतड्याचे तुकडे
नामोनिशान नसलेल्या गाड्यांमधून पसार
कुठेच कशाचा मागमूस लागत नाही.

एवढ्या शहराच्या
निस्सीम एकान्ताला
विरून नेणारा कुत्र्यांचा गोंगाट
घारींचे थवे चक्राकार आभाळभर
गिधाडे घिरघिरत डोंगर कठड्यान
गटारीनं लालजई रक्ताचे सडे
पाशवीपणाच्या बलात्काराचे कुठे
पेटलेले धिंडवडे, कित्येक मोहल्ल्यांतून
पारतंत्र्यातले
प्रचंड भेदलेपण
संबंध शहरावर अंगरखा पांघरून
कागदांचे ढीग फेकून साहेब
घामेजून भयग्रस्त
नीट बोलत नाही
नीट ओळखत नाही
समोरच्या ओळखीच्या
आपल्या माणसांना
लालजर्द फितीच्या
बांधल्या कागदांना
सोडत नाही साहेब
साहेब अस्वस्थ
राजवर्खी सिंहासनात
बसलेले एकटे.

मी ऐकून घेणार नाही
मी काहीच ऐकणार नाही
चालते व्हा म्हणतो ना
बिलकुल चालते व्हा इथून
ह्याला पुण्याला धाडा
ह्याला ठाण्याला धाडा
कसा काय चालणार
ह्या राज्या गाडा ?
काहीच पाहू नका
काहीच ऐकू नका
दिसतील त्यांना दिसतील तिथे
तात्काळ गोळ्या घाला
मी पाहून घेईन नीट
पाहून घेईन थेट मुंबईपर्यंत
आता मी कोणाचीच गय करणार नाही
त्याशिवाय हे राज्य चालणारच नाही
हे राज्य खरे तर गरीब दुबळ्यांचे
तळागाळातल्या
झोपडीतल्या माणसांचे

हे राज्य खरे ज्यांचे
त्यांनाच इथे नीट जगता येत नाही
हे राज्य कोणा एक धर्माचे नाही
हे राज्य खरे तर
रयतेचे
कुणाच्या बापाचे नाही
मी पाहून घेईन
कितीही मोठा असेल
कोणी कुठल्या पंथाचा
मी कारवाई करीन
पण पाणी द्या थंडगार
पाणी द्या आधी
ह्या पेपरवाल्यांना इथून
घालवून द्या आधी
हे रक्तबंबाळ लोक
हटवा माझ्या समोरून दूरवर
असतील आमदार लोकांचे कैवारी
मला तर दिसताहेत ह्या शहराचे वैरी
प्रेषितासारखे उजाडतात अकस्मात
आणि करकरीत भाषणं ठोकतात
स्वत:ला सावरून, सगळं उद्‌ध्वस्त झाल्यावर
पुन्हा आम्हालाच जाब विचारतात.
म्हणे हे कैवारी ?
सगळं शहर गळाबंद झालेलं
मला ह्या खिडकीतून
सगळेच रस्ते ओसाड दिसतात
प्रत्येक पावलांवर
झेंडेच दिसतात
हिरवे भगवे
आणखी वेगवेगळे
कसे काय रोवतात
रस्त्यारस्त्यांवर
तेव्हा ह्या शहरभर तुमचे हात
कसे काय कुठे गुंतलेले असतात.
मला घरघर येते ह्या सिंहासनावर
पाणी द्या
थंडगार पाणी द्या . . .
रक्तबंबाळ माणसं, कागदांचे भेंडोळे
पहिल्यांदा समोरून घालवून द्या बाजूला
मला काहीच कसं कळलं नाही . . .
कोणीचं कसं सांगितलं नाही ?
सर्वत्र इतके घनघोर जळताना
काहीच कसं नीट कळलं नाही ?

साहेब,
परिस्थिती गंभीर आहे
फारच फार गंभीर आहे
बाकीचं सगळं नंतर बोलू ....
हा अहवाल तरी थोडासा वाचून घ्या एकदा
आणि आम्हाला आधार द्या एकदा
आपलेच दात आणि आपलेच ओठ
असे पुष्कळ काही, कुठेच कुणाला धरबंध नाही
सांगतो आखलेलं . . . झाकलेलं सर्व काही.
साहेब तुमच्या कानात सांगतो
एवढं तरी थोडं ऐकून घ्या आमचं
आख्खं शहर वठणीवर येईस्तो
आख्खं शहर पहिल्यागत होईस्तो
थोडंसं साहेब समजून घ्या आम्हाला
परिस्थिती फारच गंभीर आहे, साहेब ...

निर्मनुष्य शहराच्या
राजरस्त्यावरून गाड्या निघाल्या
गिधाडासारख्या
शंभरेक दोनशे

कडेकोट बाहेर गावकुसाबाहेर
दूरवर विच्छिन्न
रडणाऱ्या कुढणाऱ्या
झोपड्या ओलांडून
शहराबाहेरच्या
नजिकच्या खेड्यावर
पांढरीच्या शेतात
छबील्याशी सगळ्या गाड्या थांबल्या
लालजर्द दिव्यांच्या

पदर तोंडाला लावून रडणारी
वीसेक वर्षांची गर्भारशी पोर
करपून गेलेल्या पिकाच्या तिच्या
पांढरीच्या शेतावर
एकटीच.
आसमंतात किंकाळ फोडून
रडताना साहेबासमोर
घामेजल्या पदरानं
घामेजल्या पदरानं
पुसलेलं तिचं लाल जर्द कपाळ
सगळ्याच साहेबांना भयभीत करणारं
ती काहीच बोलली नाही
तिनं शिवी दिली नाही
तिनं सही केली नाही
ठेवलेल्या कागदावर,
फक्त वेड्यागत किंचाळत राहिली
पुसलेल्या लालजर्द कुंकवासाठी
निराधार. गर्भार.
शेलाटी. एकटी.
पुन्हा पुन्हा
ओथंबून किंचाळत राहिली
धाबल्यात जाऊन
फाडलेल्या पदरात
दहा हजार गुंडाळले
साहेबांनी दिलेले.
साहेबांसमोरच
आक्काडी लावली
आणि ती पुन्हा दुःखाच्या ओझ्यानं
गर्भाच्या ओझ्यानं कोसळून पडली.
उठताना पुन्हा ज्वाळांकडे पहात
किंचाळत राहिली.
मुसलमान हिंदू
आणि कित्येक जातींच्या
उद्ध्वस्त संसारातल्या
शंभर दोनशे रांडव मायबहिणींच्या वतीनं
तिनं हंबरडा फोडला साहेबांच्या दिशेनं
गाडीवर फडकणाऱ्या तिरंगी झेंड्याकडे
ओलावल्या डोळ्यानं.
गाड्या भयग्रस्त निघून गेल्या
काही न बोलता साहेबांसकट
जुन्या वळवल्या वळणावरून
अबोल इमारती .... झेंडे टाकून.
शहराचे अंगावर येणारे रस्ते
रस्ते परस्पर विमानाकडे भरधाव गेलेले
आल्यागत विमान निघून गेलेलं
दूरवर आभाळात, गिधाडासारखं
निश्चित विमानतळ ....
सुटलेले एकदाचे निश्चित सगळेच
थोडा वेळ गंभीर ......
शांतता कमिटीची आठवण होऊन
लगबग निघालेले
महात्मा गांधी काँग्रेस भवनाच्या दिशेनं
आपापल्या बंदुका सावरून, घाबरून.

कागदपत्र सह्या
छायाचित्र आणखी पंचनामा इत्यादी
सगळंच घ्यायला थांबलेला अधिकारी
विचलित झालेला ..... धाबल्याजवळ
गळाभर दाटलेला
दहा हजारांच्या जळत्या ज्योतीसमोर.
वेड्यागत वेंधळा हात जोडून
प्रार्थना म्हणताना
अजिंठा-वेरुळच्या करुणामयी बुद्धाला
घृष्णेश्वराच्या ओंकारासमोर
नाथांचे भारूड, आपेगाव आळवताना
जगाचं शहाणपण सर्वत्र इथे
ह्या खुल्ताबाद रस्त्यावर कबीर शोधताना
पसायदान म्हणताना भाबडा अधिकारी
जळत्या काजळत्या ज्योतीसमोर
वेडा झालेला
भटकतो आहे भयाण भुयारातून
खुल्ताबादच्या तळघरात जाऊन
अजिंठा-वेरूळच्या डोंगर झाडीत
निष्पर्ण तरीही
रस्ता विसरलेला
वेडा अधिकारी
माणसातला हरवलेला माणूस शोधतो आहे
प्रार्थना म्हणतो आहे
राष्ट्रगीतामधल्या एकसंध शब्दांची
अथांग सर्वांची . . .
गळाभर दाटलेले राष्ट्रगीत
ज्योतीच्या राखोंडीसमोर
पुन्हा पुन्हा गातो आहे.
शुद्धीवर आल्यावर वेडा सही मागतो आहे
गर्भार पोरीच्या कागदपत्रांसाठी ...
वेडी माणंस धुंडतो आहे पंचनाम्यासाठी
- अजून पंचनामा व्हायचाच आहे !

----x----

स्वातंत्र्यानंतरच्या तीन-चार दशकांत
संपन्नपणानं उभा राहिलेला देश
शेतीबाडी, उद्योगात
बोल बोलता एकाएक, ठायी ठायी कफल्लक झाला.
मोहोळाच्या भरगच्च माशांसारखा
दाटीवाटीनं भरलेला . . .
शिगोशीग माणसांनी भरलेला . . .
भौतिक गरजांनी भुताटकी झालेला हा देश.
ओरबाडून काढलं देशातलं सगळं
धनधान्य आणखी भूगर्भातलं पाणी.
मोडून काढताना चांगल्या योजनांना, माणसांना
शासनालासुद्धा, रितं करून टाकणारे शिरोमणी
राक्षसी हातांनी अनाठायी अकांक्षांनी
देशभर फिरताना अनवाणी, नियोजन नसलेला हा देश
आता दवंडी पिटतात कंगाल ...
आलटून पालटून हेच कर्तेधर्ते, आपल्या तोंडांनी
यांचं कोण ऐकणार ? स्वातंत्र्याला आता अर्धशतक झालंय . . .
शंभर कोटीचं. वखवखल्या पोटांचं.
ऋतुचक्र दररोज बदलून चाललंय . . .
रोज, दररोज निर्दय पावलांनी.
वाहून जाणाऱ्या पाण्याला कुठेच अटकाव नाही.
बलवत्तर कुठल्या योजना नाहीत देशीपणाच्या . . .
लहान खेड्यांच्या, प्रांताप्रांतांत तिथल्याच निसर्ग रचनेच्या.
कोरडीची शेती पिकणार तरी किती ?
पिकलेल्या मालाला कवडीमोल विकताना
हाताला पैसे लागणार तरी किती ?
कष्टकऱ्यांच्या घामाला, कष्टकऱ्यांच्या श्रमाला
पाहिले ते मोल नाही.
समजून घेतलं जाईल आपलेपणानं
अशी शासनाला ओल नाही.
सर्वत्र दुरावा वाढत चाललेला. काळसर्पांसारखा.
शहरं आणखी खेडी

श्रीमंत आणखी गरीब यांतली दरी वाढविणारा
गगनगर्द इमारती आणखी झोपडपट्ट्यांमध्ये
अंगार लावणारा
असला दुरावा.
संस्कृतीच्या देशाला पार छिन्नभिन्न करणारा.

इथल्या स्वातंत्र्यात, आमच्या सार्वभौम स्वातंत्र्यात
पासर बदलून गेलेल्या या दहा पाच वर्षात
मतांचे मानकरी आता साळसूद राहिलेले नाहीत.
त्यांच्या ऐश्वर्यात त्यांचे सिंहासन त्यांना लखलाभ असो.
मोक्यामोक्यावर झेंडे रोवले त्याचे दुःख नाही
पण जातीजातीत माणसांच्या कप्पे केले विखार विखरून
सोईस्कर आपापले झेंडे उभारले, त्यांनाच वाळीत टाकून
गुण्यागोविंदानं नांदणारी खेडी विदीर्ण करून टाकली
आणि जिवाभावाचे भावबंध मोडून काढले
माणसामाणसांना आंधळं केलं पैशांवरती.
गनमन भोवल्याभवती भिरंगत ठेवलं.
आयुष्यात हजारदा चढतांना, पडतांना अशी कुटाळ नीती.
छाताडावर घट्ट झेंडे कवळून बसलात
काळपटल्या पैशांचं गाठोडं बांधून
आजन्म किल्ले लढवीत राहिलात.
बापहो, आम्ही आंधळे का आहोत ?
गटारातल्या कवड्या माळून गळाभर
साधुत्व मिरवलंत गडगंज संपत्तीचं.

दिवसाढवळ्या, सोन्याच्या कौलांनी घरं उभारतील
तुमच्या देवघरासमोर
साधूसंतांसमोर -
तासंतास घोकतांना, पूजापाठ करतांना
घाबरून भरभक्कम होमहवन केले, आम्ही आंधळे का आहोत ?

शेतकऱ्याच्या घरात लहानसा दिवा
मजुराच्या वाट्याला सदोदित दुष्काळ, रोजगार हमीची हवा.

शेतकऱ्यांच्या बैलगाडीचं चाकही चालत नाही
रस्त्यानं शेताच्या
उतरत्या धावांचे आरेपाठे ठोकतांना
रक्ताळून गेलेल्या हातांच्या बोटांच्या
असह्य वेदना कधी पाहणार आहात का ?
त्याच्या छाताड्यावरून रथयात्रा काढता
ऐश्वर्यणसंपन्न, आठवड्यांत एवढा देश पादाक्रान्त करता.
सगळंच छान, राजे हो, छानच चाललंय् या देशात.
मूठभर लोकांच्यासाठी तुमची आनंदयात्रा तुम्हांला लखलाभ होवो
जिवाचे प्राण करून या देशात
क्रिकेटचे रन मोजले जाता.
कष्टकरी शेतकऱ्यांचे रन कधीच मोजले जात नाहीत.
खऱ्या अर्थानं, बहुसंख्य असूनही
प्रत्येक दुष्काळ बोलबाला केला जातोय मोठ्यांदा
शेतकऱ्याच्या नावानं, प्रचंड काळजीवाहू शब्दाशब्दानं

पोटाला चार भाकरी बांधून कधीच भूक भागत नसते
फक्त चतकोर भाकरी प्रत्यक्ष पोटात पाहिजे असते
चिरगुटे बांधून पोटाला कधीच गर्भारपण येत नसतं
हे सगळं खुद्द तुकोबानंच सांगून ठेवलं आम्हांला.
म्हणून सांगतो बापहो, आता तरी तोंडपाटीलकी बंद करा.
बंद करा. धूळफेक भाषणबाजींची, रस्त्यारस्त्यांवर
या निवडणुकांच्या तोंडावर
देणग्यांचा पाऊस बंद करा. बापहो बंद करा सगळं.
कोणाच्या बापाचं काय जातं
कोरडी आश्वासनं द्यायला ? पाच वर्षात हे कसं काय समजलं नाही
लोकशाहीचा कुठलाही देश अशानं उभा राहाणारच नाही
एवढं तरी पुस्तकं वाचून कळतंय आम्हांला
थोडी तरी सत्याची, व्यवहाराची जोड हवी
प्रत्येक वेळी काढली जाते कुठली तरी घोषणा नवी
आपणही अनागोंदी चकव्याच्या रिंगणात किती जावं ?
पुन्हा एकदा आपल्यालाच आपण नीट तपासून घ्यावं.

शेतीला ओंजळभर पाणी हवं पाणी
आणि तुकोबाच्या शुद्ध बीजाची पेरणी
त्याशिवाय हवं असतं घामाचं पाणी
माणसानं माणसाला पारखं व्हावं
असे बेचिरास दुष्काळ आले वारंवार
लोक सामोरा गेले भारतवर्षात
राज्यकर्तेही थेट हातात हात घालून दुष्काळात
घनघोर दुष्काळात दिवस निघून गेले
दुष्काळ नवा नाही या भारतवर्षांत.
कधीच कोणी गेले नाहीत त्या काळोखी रस्त्यानं
काळोखी रस्त्याचा मार्ग कधीच आपला नाही
शासनानं कितीही दिलं तुम्ही गेल्यावर
तरी राहिलेला संसार कोणी बांधूच शकणार नाही
तुमच्याशिवाय.
तुमच्याशिवाय निरर्थ अवघ्य संसाराचा भार
हे मायावी मृगजळ थांबवलंच गेलं पाहिजे
आणि मर्तिकांच भांडवल करणाऱ्यांनाही आता हात जोडले पाहिजेत.
मला खूपच खूप सांगायचंय . . . आई.
माझी दमछाक होते लिहितांना बोलतांना
उंच स्वरात कधी कवितेतून गातांना

हे मी थांबवाव म्हणून
नेस्तनाबूत करण्याची मला पत्रं येतात, याचा अर्थ कळत नाही आई
कुठल्याच पत्रात नाव नाही गाव नाही
अशी ही अनौरस भेदरट माणसं, खूप आव आणतात ग आई
त्यांची कीव करावी वाटते, यापेक्षा काहीही नाही.

अभिव्यक्तीस्वातंत्र्य वगैरे खड्ड्यात घालून
मला नेस्तनाबूत करण्याची पत्रं येतात
मायबाप शासनाच्या दरबारात पत्रं सुखरूप असतात बिचारी.
अंगाला पान लागू न देता राज्यकर्तेही सोईस्कर मूग गिळून बसतात
मला नेस्तनाबूत करणं तसं सोपं आहे गं आई . . .
पण ओठाओठांवर रुतून बसलेल्या कवितेच्या ओळीचं करणार काय ?

फाल्गुन वद्य बीज . . . मला अस्वस्थ करते
फाल्गुन वद्य बीज माझ्या डोळ्यांवर येते
काळपटल्या रंगांची धुळवड घेऊन
त्या अभंगांची गाथा माझं काळीज उसवते
टेकाडावरली ... घोंगडी आणि टाळ
मी कवटाळून घेतो मनाच्या देव्हाऱ्यात
हलक्या हातानं दिवा लावतो
माझ्या तळघराच्या देवघरात
आख्खा काळोख वितळून जातो ग आई
लखलख उजेडात लखलख माझ्या तळघरातल्या देव्हाऱ्यात.

मी रानभर भटकतो टेकड्यांवरून, नदीनाल्यांतून
वृक्षवल्लीच्या घनदाट सावल्या पांघरून
पाऊस पाण्याचं लदबदलं आकाश
मला घेऊन जातं अवकाशात
दिगंतात, तुकोबाच्या निर्मळ प्रदेशात.
तुकोबाच्या निर्मळ कवितेच्या प्रदेशात
मी फेकून देतो गाठोडं सगळ्याच दु:खितांचं
जगण्या मरण्याचं, देशातल्या नाठाळांचं
सुंदर पवित्र माझ्या देशासाठी पुन्हा जोगवा मागतो. कवितेतून
कुणब्यांच्या सुंदर शेतीवाडीसाठी
इंद्रायणीच्या काठी शब्द वेचायला निघतो.
अगदी नकळत किती बोलून गेलो ग आई
मी बोललो ते माझं मलाच कळत नाही.
काय बोललो आणि कशासाठी ?
मला अस्वस्थ करणाऱ्या सत्य असत्याची ग्वाही दे आई
संपूर्ण सामर्थ्यानं उभं राहण्यासाठी शक्ती दे आई
पुष्कळ पुष्कळ बोलायचं आहे अजून . . .
पुन्हाकधी स्वप्नात भेटशील तेव्हा खूप सांगायचंय अजून ..

-----x-----